ePaper
इंजिनिअरिंग करणाऱ्यांसाठी मोठी बातमी! देशभरातील 58 महाविद्यालये बंद

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 06 जुलै 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





पान 3 वरुन...

पावसाळ्यात वाहतूक कोंडीला ब्रेक!

## पहिल्या १०० देशांच्या यादीतून बाहेर; युरोपचा दबदबा कायम

# भारताची पासपोर्ट रँकिंगमध्ये घसरण




**महाईन्यूज ।**
**नवी दिल्ली**

**जागतिक पासपोर्ट निर्देशांकात (पारपत्र निर्देशांक) भारताची एका स्थानाने घसरण होऊन तो १२५ व्या स्थानावर आला आहे. गेल्या वर्षी भारत १२४ व्या क्रमांकावर होता. यादीत युरोपियन देशांचा दबदबा असून, स्वीडनने क्रमवारीत अव्वल स्थान पटकावले आहे. या क्रमवारीत पहिल्या १० देशांमध्ये सिंगापूर हा केवळ एकच आशियाई देश आहे.**

ग्लोबल सिटिझन सोल्यूशन्स (जीसीएस) ने प्रसिद्ध केलेल्या पाचव्या वार्षिक अहवालानुसार, नामिबिया १२४ व्या स्थानावर असून भारताच्या पुढे आहे, तर अझरबैजान १२६ व्या स्थानावर आहे. जागतिक पासपोर्ट निर्देशांक जागतिक गतिशीलता, गुंतवणुकीची क्षमता आणि जीवनमान यावर आधारित पासपोर्टची ताकद विचारात घेतो. या क्रमवारीत १९७ देशांपैकी भारत १२५ व्या क्रमांकावर आहे.

गेल्या वर्षी भारत १२४ व्या क्रमांकावर होता. २०२१ मध्ये तो १२७ व्या क्रमांकावर होता. २०२१ पासून आतापर्यंतची कामगिरी पाहता, भारताच्या स्थानात दोन निर्देशांकाने सुधारणा झाली आहे. इतकेच नाही, तर भारताचा एकत्रित स्कोअर देखील ४५.१ वर पोहोचला आहे. अहवालानुसार, भारत २६ देशांतील लोकांना व्हिसा-मुक्त प्रवेश देतो. यामध्ये भूतान, जमैका, मकाऊ, नेपाळ, पॅलेस्टाईन, ट्युनिशिया आणि अंगोला यांचा समावेश आहे.

### जगातील टॉप १० शक्तिशाली पासपोर्ट:

१. स्वीडन
२. स्वित्झर्लंड
३. फिनलंड
४. जर्मनी
५. नेदरलँड्स
६. डेन्मार्क
७. आयर्लंड
८. युनायटेड किंगडम
९. नॉर्वे
१०. सिंगापूर

### भारताचा पासपोर्ट कमकुवत का झाला ?

भारताचा पासपोर्ट कमकुवत होण्यामागे त्याच्या मोबिलिटी स्कोअरला जबाबदार धरले जात आहे. २०२१ मधील १८ व्या स्थानावरून २०२६ मध्ये २३ व्या स्थानापर्यंत त्यात सुधारणा झाली आहे. दरम्यान, इतर देशांमध्ये प्रवासाची सोय झपाट्याने वाढली आहे. परिणामी, एकूण क्रमवारीत भारताला फटका बसला आहे. पहिल्या १० देशांमध्ये सिंगापूर हा एकमेव आशियाई देश आहे. गतिशीलता आणि गुंतवणुकीच्या बाबतीत सिंगापूरचा पासपोर्ट लक्षणीयरीत्या पुढे आहे.

### २६ देशांमध्ये 'व्हिसा-मुक्त' प्रवेश

अहवालानुसार, भारतीय पासपोर्टद्वारे २६ देशांमध्ये व्हिसा-मुक्त प्रवेश मिळतो. भारतीय पासपोर्टधारक हे भूतान, जमैका, नेपाळ, पॅलेस्टाईन, ट्युनिशिया, अंगोला या सारख्या देशांमध्ये व्हिसा-मुक्त प्रवास करू शकतात. किंवा तिथे पोहोचल्यावर व्हिसा (व्हिसा ऑन अरायव्हल) मिळवू शकतात. तसेच अमेरिका, युनायटेड किंगडम, जर्मनी, फ्रान्स, चीन, संयुक्त अरब अमिराती यांसारख्या ८८ देशांना भेट देण्यासाठी भारतीय नागरिकांना अजूनही व्हिसाची आवश्यकता असते.

### ८८ देशांत प्रवेशासाठी व्हिसा आवश्यक

अमेरिका, युनायटेड किंगडम, जर्मनी, फ्रान्स, चीन, संयुक्त अरब अमिराती यांसारख्या ८८ देशांना भेट देण्यासाठी भारतीय नागरिकांना व्हिसाची आवश्यकता आहे. ग्लोबल पासपोर्ट इंडेक्स क्रमवारीसाठी तीन मुख्य मापदंडांचा वापर करण्यात आला. यात वाढीव गतिशीलता (५० टक्के), गुंतवणूक (२५ टक्के) आणि राहणीमानाचा दर्जा (२५ टक्के) या तीन घटकांचा समावेश आहे. जागतिक निर्देशांकात स्वीडन अव्वल स्थानी आहे, त्यानंतर स्वित्झर्लंड, फिनलंड, जर्मनी, नेदरलँड्स, डेन्मार्क, आयर्लंड, युनायटेड किंगडम, नॉर्वे आणि सिंगापूर यांचा क्रमांक लागतो. भारताचा शेजारी देश चीन या क्रमवारीत १०४, बांगलादेश १६६ ,नेपाळ १६४ आणि पाकिस्तान १८८ व्या क्रमांकावर आहे. पाकिस्तान सर्वात कमी क्रमांकाच्या देशांपैकी एक आहे. अमेरिका आणि फ्रान्स दोन्ही ११ व्या क्रमांकावर आहेत. कॅनडा १३ व्या क्रमांकावर आहे. सोमालिया, दक्षिण सुदान, येमेन आणि सीरिया हे जगातील सर्वात कमकुवत पासपोर्ट असलेल्या देशांपैकी आहेत. एरिट्रिया १९३ व्या क्रमांकावर आहे आणि मध्य आफ्रिकन प्रजासत्ताक १८९ व्या क्रमांकावर आहे.

# म्हाडाच्या ४ हजार परवडणाऱ्या घरांची सोडत जुलैअखेरीस

## अत्यल्प व अल्प उत्पन्न गटाला मोठा दिलासा; २० टक्के योजनेतून हजारो घरे उपलब्ध

**महाईन्यूज । पुणे**

**म्हाडाच्या पुणे मंडळाकडून फेब्रुवारीमध्ये ४,१८६ घरांची सोडत काढण्यात आली होती. तर काही दिवसांपूर्वीच ताथवडेतील ७९२ घरांसाठीची सोडत पार पडली आहे. अशात आता पुणे मंडळाने पुण्यातील आणखी अंदाजे ४ हजार घरांची सोडत काढण्याची तयारी सुरू केली आहे. ही तयारी पूर्ण करून जुलैअखेरीस या घरांसाठी जाहिरात प्रसिद्ध केली जाणार आहे. जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर नोंदणी, अर्जविक्री-स्वीकृती प्रक्रियेस सुरुवात केली जाणार आहे.**




म्हाडाच्या पुणे मंडळाच्या या घोषणेमुळे पुण्यात खासगी विकासकाच्या प्रकल्पात परवडणाऱ्या दरात हक्काचे घर घेण्याची संधी इच्छुकांना मिळणार आहे. कारण ४ हजार घरांपैकी अंदाजे ३ हजार घरे २० टक्के योजनेतील आहेत.

मुंबई महानगर प्रदेश, नाशिक येथे २० टक्के सर्वसमावेशक योजनेतील घरे म्हणावी तशी उपलब्ध होत नसली, तरी पुणे मंडळाला मात्र मोठ्या संख्येने २० टक्के योजनेतील घरे उपलब्ध होत आहेत. पुणे मंडळाकडून सातत्याने संबंधित पालिकांकडे पाठपुरावा केला जात असल्याने गेल्या वर्षी मंडळाला २० टक्के आणि १५ टक्के एकात्मिक योजनेतील एकूण ४,१८३ घरे उपलब्ध झाली होती. या घरांसाठी सप्टेंबर २०२५ मध्ये सोडतपूर्व प्रक्रिया सुरू केली, तर फेब्रुवारी २०२६ मध्ये सोडत काढण्यात आली आहे. आता मंडळाला २० टक्के योजनेतील आणखी अंदाजे ३ हजार घरे उपलब्ध झाली आहेत. तेव्हा या ३ हजार घरांसह रिक्त अंदाजे १ हजार घरे मिळून एकूण अंदाजे ४ हजार घरांसाठी सोडत काढण्याची तयारी मंडळाने सुरू केली आहे.

त्यामुळे पुण्यात परवडणाऱ्या दरात म्हाडाच्या माध्यमातून खासगी विकासकांच्या प्रकल्पात घर घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे इच्छुकांनी आता तयारीला लागावे, असे आवाहनही मंडळाने केले आहे.

जुलैअखेरीस ४ हजार घरांच्या सोडतीसाठीची जाहिरात प्रसिद्ध केली जाणार असल्याची माहिती पुणे मंडळाचे मुख्य अधिकारी राहुल साकोरे यांनी दिली. २० लाख ते ३० लाखांपर्यंतची घरे पिंपरी-चिंचवड पालिका, पुणे पालिका आणि पीएमआरडीएकडून मंडळाला अंदाजे ३ हजार घरे २० टक्के योजनेअंतर्गत उपलब्ध झाली. ही घरे अत्यल्प आणि अल्प गटासाठी असणार असून, ही घरे ३० ते ५० चौ. मीटरची असणार आहेत.

### सोडतीची ठळक वैशिष्ट्ये

म्हाडा पुणे मंडळाकडून अंदाजे ४ हजार घरांची सोडत जुलैअखेरीस जाहीर होणार आहे. यापैकी सुमारे ३ हजार घरे २० टक्के योजनेअंतर्गत अत्यल्प व अल्प उत्पन्न गटासाठी राखीव असतील. या घरांची संभाव्य किंमत २० ते ३० लाख रुपयांच्या दरम्यान असण्याची शक्यता असून, जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर नोंदणी व अर्ज प्रक्रिया सुरू होईल. पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीए हद्दीतील खासगी विकासकांच्या प्रकल्पांमध्ये परवडणाऱ्या दरात घर घेण्याची ही मोठी संधी ठरणार आहे.

# पावसाळ्यात वाहतूक कोंडीला ब्रेक! पुणे पोलिसांची अनोखी मोहीम

**महाईन्यूज । पुणे**

**पावसाळ्यातील वाहतूक व्यवस्थापनासाठी क्रेडाईकडून जुलै ते सप्टेंबर या कालावधीत १०० प्रशिक्षित ट्रॅफिक वॉर्डन्स नेमण्यात आले आहेत. या बाबत पुणे पोलीसांबरोबर करार करण्यात आल्याची माहिती 'क्रेडाई'कडून देण्यात आली. 'क्रेडाई'च्या ट्रॅफिक वॉर्डन्सच्या नेमणुकीसाठी आयोजित कार्यक्रमाला पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सह-पोलीस आयुक्त संजय दराडे, वाहतूक शाखेचे अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त डॉ. संदीप भाजीभाकरे, 'क्रेडाई'चे अध्यक्ष मनीष जैन, या उपक्रमाचे संयोजक संजय देशपांडे, निवृत्त कर्नल कुमार रामचंद्रन उपस्थित होते.**



शहराच्या वेगवेगळ्या भागांत सुरू असलेली रस्त्याची-मेट्रोची कामे आणि त्यात मुसळधार पावसामुळे वाहतूक कोंडीत वाढ होते. अशा परिस्थितीत 'क्रेडाई'चे स्वयंसेवक वाहतूक पोलिसांना वाहतुकीच्या नियमनात मदत करतील. शहरातील वेगवेगळ्या भागांत, मुख्य चौकांमध्ये त्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. वाहतूक सुरळीत ठेवणे, कोंडी कमी करणे आणि गर्दीच्या वेळी आणि सार्वजनिक कार्यक्रमांदरम्यान सुरक्षिततेस हातभार लावण्याची जबाबदारी या स्वयंसेवकांवर असेल. त्यासाठी त्यांना वाहतूक व्यवस्थापनाचे नियम, प्रत्यक्ष कार्यपद्धती आणि प्रत्यक्ष कामकाजाचे विशेष प्रशिक्षण देण्यात आल्याचेही 'क्रेडाई'कडून कळविण्यात आले.

हे सर्व ट्रॅफिक वॉर्डन्स करार पद्धतीवर कार्यरत राहतील. ते दररोज सकाळी ८.०० ते रात्री ८.०० या वेळेत नियोजित विश्रांतीसह सेवा देतील. कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने जवळपास निम्म्या वॉर्डन्सची नियुक्ती त्यांच्या निवासस्थानाजवळील भागात करण्यात येणार असून, उर्वरित वॉर्डन्सना पुणे वाहतूक पोलिसांच्या गरजेनुसार शहरातील महत्त्वाच्या चौकांमध्ये आणि संवेदनशील ठिकाणी तैनात करण्यात येईल.

याविषयी बोलताना क्रेडाई पुणेचे अध्यक्ष मनीष जैन म्हणाले,'क्रेडाई पुणेच्या दृष्टीने शहराच्या विकासात योगदान देणे म्हणजे केवळ घरे बांधणे नव्हे. मान्सून काळात पुणे वाहतूक पोलिसांच्या कार्याला बळ देण्यासाठी या उपक्रमात सहभागी होताना आम्हाला आनंद होत आहे. . प्रभावी वाहतूक व्यवस्थापनाचा लाभ प्रत्येक नागरिकाला होतो. अतिरिक्त मनुष्यबळाच्या माध्यमातून पुणेकरांचा दैनंदिन प्रवास अधिक सुरक्षित, सुलभ आणि सुरळीत होण्यास मदत होईल, अशी आम्हाला अपेक्षा आहे.'

अमितेश कुमार म्हणाले,'या उपक्रमाद्वारे पुणे वाहतूक पोलिसांना सहकार्य केल्याबद्दल मी क्रेडाई पुणेचे सर्व सदस्य, विशेषतः श्री मनीष जैन आणि श्री संजय देशपांडे यांचे मनःपूर्वक आभार मानतो. सर्व ट्रॅफिक वॉर्डन्सना प्रत्यक्ष सेवेत रुजू होण्यापूर्वी आवश्यक प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्यांनी या प्रशिक्षणाचा प्रभावी वापर करून प्रामाणिकपणे आणि शिस्तबद्ध पद्धतीने आपली जबाबदारी पार पाडावी. नागरिकांशी नेहमी नम्र, सन्मानपूर्वक आणि सौजन्यपूर्ण वर्तन ठेवावे. मान्सून काळात तसेच मोठ्या सार्वजनिक कार्यक्रमांदरम्यान शहरातील वाहतूक व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यामध्ये त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे ठरेल.'

### १०० ट्रॅफिक वॉर्डन्स मैदानात

पावसाळ्यातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी 'क्रेडाई'कडून जुलै ते सप्टेंबर या कालावधीत १०० प्रशिक्षित ट्रॅफिक वॉर्डन्स पुणे वाहतूक पोलिसांच्या मदतीसाठी कार्यरत राहणार आहेत.

# गुणवंतांच्या स्वप्नांना मिळालं 'उड्डाण'

## शत्रुघ्न काटे यांच्या पुढाकाराने १० वी, १२ वीच्या विद्यार्थ्यांचा सायकल व करंडक देऊन गौरव

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपळे सौदागर आणि रहाटणी परिसरातील इयत्ता १० वी आणि १२ वीच्या (SSC/HSC, CBSE, ICSE) गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी आणि त्यांना भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी दिशा देण्याच्या उद्देशाने, भाजप पिंपरी- चिंचवड शहराध्यक्ष तथा नगरसेवक श्री.शत्रुघ्न (बापु) काटे यांच्या वतीने आयोजित "गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा आणि क्रिटिकल डिसिजन मेकिंग सेमिनार २०२६" अत्यंत उत्साहात संपन्न झाला. हॉटेल गोविंद गार्डन 'बासुरी बँकविट हॉल' येथे रविवार, ५ जुलै २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता हा दिमाखदार सोहळा पार पडला.**




या शिबिराचे मुख्य आकर्षण असलेले देशपातळीवरील प्रसिद्ध 'बाकलीवाल ट्युटॉरियल्स'चे संचालक व आयआयटी मुंबईचे (B. TECH. IIT BOMBAY) माजी विद्यार्थी श्री. वैभव बाकलीवाल यांनी उपस्थित शेकडो विद्यार्थ्यांना 'करिअर निवडीबाबतचे महत्त्वपूर्ण निर्णय' (CRITICAL DECISION-MAKING) कसे घ्यावेत, यावर अत्यंत मोलाचे व प्रभावी मार्गदर्शन केले. १० वी व १२ वी नंतर उपलब्ध असणाऱ्या विविध विद्याशाखा आणि राष्ट्रीय पातळीवरील संधी याबद्दल त्यांनी सखोल माहिती दिली.

कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक बोर्डातील (SSC, CBSE, ICSE) पहिल्या ३ प्रथम क्रमांकाच्या गुणवंत टॉपर्सना प्रोत्साहन म्हणून सायकल, भव्य ट्रॉफी (करंडक), सॅक (GUDDY BAG), वह्या, पेन आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच, सोहळ्यात सहभागी झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला शैक्षणिक वाटचालीस मदत म्हणून सॅक, नोटबुक, पेन आणि प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना भाजप शहराध्यक्ष श्री.शत्रुघ्न काटे म्हणाले, "पिंपळे सौदागर आणि रहाटणी परिसरातील मुलांनी यंदाच्या परीक्षांमध्ये घवघवीत यश संपादन करून आपल्या भागाचे नाव उज्ज्वल केले आहे. या विद्यार्थ्यांच्या कष्टाचे कौतुक करणे आणि त्यांना पुढील प्रवासासाठी योग्य दिशा देणे हे आमचे कर्तव्य आहे. वैभव बाकलीवाल सरांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे क्षेत्र निवडण्यास नक्कीच मदत होईल."

याप्रसंगी नगरसेविका सौ.कुंदाताई भिसे,नगरसेविका सौ.अनिताताई काटे,पवना सह. बँक संचालक श्री. जयनाथशेठ काटे,श्री भानुदास काटे पाटील,श्री पोपटतात्या काटे, श्री बाळासाहेब काटे,श्री प्रकाश तात्या झिंजूर्डे,सौ स्वप्नाताई शत्रुघ्न काटे,श्री कैलासशेठ कुंजीर श्री संजयशेठ भिसे,श्री संदिपशेठ काटे,श्री मनोज ब्राम्हणकर,श्री राजेश पाटील,सौ. सुप्रियाताई पाटील,श्री प्रविण कुंजीर,श्री बाळकृष्ण परघळे,श्रीमती शितल पटेल,श्री समीर देवरे,श्री दिपक गांगुर्डे यांच्यासह शत्रुघ्न काटे युथ फाउंडेशन कार्यकर्ते, पालक आणि शेकडो विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर इंद्रायणी नदीपात्रात उतरण्यास बंदी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**आषाढी वारी पालखी प्रस्थान सोहळा २०२६ निमित्त संत ज्ञानेश्वर माऊलींच्या दर्शनार्थ आणि प्रस्थान सोहळ्याचा सोहळा अनुभवण्यासाठी आळंदी नगरीत लाखो वारकरी व भाविक दाखल होत आहेत. मात्र, गेल्या काही दिवसांपासून होत असलेल्या पावसामुळे इंद्रायणी नदीच्या पाण्याच्या पातळीत मोठी वाढ झाली असून, पाण्याचा प्रवाह अत्यंत वेगवान झाला आहे. या पार्श्वभूमीवर कोणतीही अनुचित किंवा जीवघेणी दुर्घटना घडू नये, यासाठी आळंदी नगरपरिषदेने भाविकांना सतर्कतेचा इशारा देत इंद्रायणी नदीपात्रात न उतरण्याचे जाहीर आवाहन केले आहे.**



### प्रशासनाचे सहकार्याचे आवाहन

हा सोहळा सुरक्षित आणि सुरळीत पार पाडण्यासाठी आळंदी नगरपरिषद, पोलीस प्रशासन, महसूल विभाग, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आणि शेकडो स्वयंसेवक अहोरात्र कार्यरत आहेत. वारीमध्ये येणाऱ्या प्रत्येक भाविकाचा जीव महत्त्वाचा असल्याने, सर्वांनी एका जबाबदार नागरिकाचे कर्तव्य चोख बजावत प्रशासनाला पूर्ण सहकार्य करावे आणि प्रस्थान सोहळा सुरक्षितपणे पार पाडण्यास हातभार लावावा, अशी विनंती आळंदी नगरपरिषदेच्या वतीने करण्यात आली आहे.

प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, वारीसाठी येणारे अनेक वारकरी आणि नागरिक पवित्र स्नानासाठी अथवा इतर कारणांसाठी नदीपात्राकडे जातात. मात्र, सध्या नदीतील पाण्याचा अंदाज घेणे कठीण झाले असून वेगवान प्रवाहामुळे अपघाताची दाट शक्यता निर्माण झाली आहे. म्हणूनच सुरक्षिततेचा उपाय म्हणून भाविकांनी नदीपात्रात स्नान करण्यासाठी किंवा फिरण्यासाठी उतरू नये, अशा कडक सूचना देण्यात आल्या आहेत.

भाविकांच्या सुरक्षेसाठी नगरपरिषदेने नदीकाठावर विशेष बॅरिकेडिंग केले असून जागोजागी सुरक्षा सूचनांचे फलक लावले आहेत. याशिवाय आपत्ती व्यवस्थापन पथके आणि जीवरक्षकही नदीकाठावर तैनात करण्यात आले आहेत. भाविकांनी प्रशासनाने लावलेल्या बॅरिकेड्स ओलांडून पुढे जाण्याचा प्रयत्न करू नये, तसेच तेथे तैनात असलेल्या सुरक्षा रक्षक आणि स्वयंसेवकांच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असेही प्रशासनातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.



## भूमिका

**पश्चिम बंगालच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठी उलथापालथ झाली आहे. काँग्रेसनंतर तब्बल ३४ वर्षे डाव्यांनी राज्यावर निर्विवाद वर्चस्व गाजवले. मात्र, १९९८ मध्ये काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या ममता बॅनर्जी यांनी स्थापन केलेल्या तृणमूल काँग्रेसने २०११ मध्ये डाव्यांचा पराभव करून सत्ता हस्तगत केली.**

# तृणमूलची 'सेना'

त्यानंतर जवळपास दीड दशक ममता बॅनर्जी यांचे नेतृत्व बंगालच्या राजकारणाचे केंद्रबिंदू राहिले. मात्र, अलीकडील घडामोडींमुळे तृणमूल काँग्रेसही पक्षफुटीच्या संकटात सापडल्याचे चित्र आहे.

तृणमूलमधील मोठ्या संख्येने आमदार आणि काही खासदारांनी बंडाचा मार्ग स्वीकारल्याने पक्षाच्या मूळ अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. बंडखोर गटाने आपणच खरी तृणमूल काँग्रेस असल्याचा दावा करत पक्षाचे नाव आणि निवडणूक चिन्ह मिळावे, अशी मागणी केली आहे. हा वाद आता निवडणूक आयोगापर्यंत पोहोचला असून, महाराष्ट्रातील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या फुटीनंतर निर्माण झालेल्या परिस्थितीची पुनरावृत्ती होताना दिसत आहे.

शिवसेना फुटीनंतर एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेस फुटीनंतर अजित पवार यांनी मूळ पक्षावर दावा केला होता. त्या वेळी विधिमंडळातील संख्याबळाला महत्त्व देत आयोगाने पक्षाचे नाव आणि चिन्ह संबंधित गटांना बहाल केले. त्यामुळे तृणमूलच्या प्रकरणातही असाच निर्णय होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, केवळ आमदार-खासदारांची संख्या हा निकष असावा की पक्षाची संघटनात्मक रचना आणि मूळ नेतृत्वालाही महत्त्व द्यावे, हा मूलभूत प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे.

पक्षफुटीमागील कारणांबाबत अनेक तर्क मांडले जातात. उद्धव ठाकरे यांच्यावर पक्ष संघटनेकडे दुर्लक्ष केल्याची टीका झाली होती. परंतु, शरद पवार किंवा ममता बॅनर्जी यांसारखे सातत्याने जनतेत राहणारे नेतेही अशाच संकटाला सामोरे गेले. त्यामुळे पक्षफुटीचे कारण केवळ नेतृत्वशैलीत शोधता येणार नाही. सत्तेचे राजकारण, राजकीय स्वार्थ आणि सत्तासमीकरणे हे त्यामागील अधिक प्रभावी घटक असल्याचे स्पष्ट दिसते.





भारतीय राजकारणात पक्षफुटी नवीन नाही. काँग्रेसच्या काळातही अनेक पक्षांत फूट पडली. मात्र, फुटलेल्या गटाने स्वतःलाच मूळ पक्ष घोषित करून नाव आणि चिन्हावर दावा करण्याची प्रवृत्ती आता अधिक बळावताना दिसते. हा लोकशाहीसाठी चिंतेचा विषय आहे. कारण, अशा पद्धतीने कोणत्याही पक्षाचे मूळ नेतृत्व आणि संघटन एका क्षणात दुय्यम ठरू शकते.

लोकशाहीत सत्ताधारी आणि सक्षम विरोधक हे दोन्ही तितकेच आवश्यक असतात. विरोधी पक्षांचे अस्तित्व कमकुवत करण्याची प्रवृत्ती वाढत गेल्यास लोकशाहीचा समतोल बिघडण्याचा धोका आहे. त्यामुळे तृणमूलसह शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्षचिन्ह व नावासंदर्भातील न्यायालयीन आणि घटनात्मक निर्णय केवळ संबंधित पक्षांपुरते मर्यादित राहणार नाहीत. ते भारतीय लोकशाहीच्या भविष्यातील राजकीय परंपरा आणि पक्षव्यवस्थेची दिशा निश्चित करणारे ठरतील.

## प्रासंगिक »

### मातृभाषा आणि संस्कार

**मातृभाषेतूनच शिक्षण द्या. अखेरपर्यंत टिकतील, असे अनेक विचारवंतांनी सांगितले तरी आपल्या अहंकारापायी आपण आपल्या मुलांना प्रभाषेतूनच शिक्षण देतो. नाना फडणवीस यांच्याकडे एक बहुभाषिक गेला.**

म्हणाला, "मला सोळा भाषा उत्तम येतात. माझी मातृभाषा कोणती हे आपण ओळखून दाखवाल काय?" नाना फडणवीस म्हणाले, "अवश्य ओळखेन. पण आता दरबाराच्या कामामुळे मला अजिबात वेळ नाही. उद्या सांगतो. मी तुमचं आव्हान स्वीकारलं आहे." रात्री नानांनी त्याला भरपूर जेवायला घातलं. तो मनुष्य गाढ झोपी गेला. मध्यरात्री नाना याच्याजवळ गेले, घडाभर पाणी घेऊन त्याच्या तोंडावर मारले. तेव्हा तो मनुष्य कानडीत ओरडत उठला, "अहो, हे काय करता?" नाना फडणवीस त्याला म्हणाले, "आपली मातृभाषा कानडी." तो प्रवासी अचंबित झाला.

- तात्पर्य :

मातृभाषा आणि तिचे संस्कार आपणाला अखेरपर्यंत सोबत करतात.

'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारताने सिंधू नदीचे पाकिस्तानकडे जाणारे पाणी रोखल्याचा परिणाम पाकिस्तानवर होत असल्याचा दावा केला जात आहे.

# टाळी एका हाताने वाजत नाही!



अशा परिस्थितीत भारत आणि पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी चर्चा करून दोन्ही देशांमध्ये सलोखा प्रस्थापित करावा, अशी मागणी भारत व पाकिस्तानातील 117 जणांनी संयुक्त पत्राद्वारे केली आहे. या स्वाक्षरीकर्त्यांमध्ये फारूक अब्दुल्ला, मेहबूबा मुफ्ती, मनोज झा, हुमायून कबीर यांच्यासह अनेक भारतीय आणि पाकिस्तानी व्यक्तींचा समावेश आहे.

लेखकाच्या मते, पाकिस्तानने अनेक दशकांपासून भारताविरुद्ध दहशतवादाला प्रोत्साहन दिले, घुसखोरी, बॉम्बस्फोट आणि जम्मू-काश्मीरमधील हिंसाचार घडवून आणला. अशा पार्श्वभूमीवर भारताने कठोर भूमिका घेणे आवश्यक होते. पूर्वीच्या मवाळ धोरणामुळे पाकिस्तानचे मनोबल वाढले आणि भारतावरील दहशतवादी कारवाया सुरूच राहिल्या, असे मत व्यक्त करण्यात आले आहे.

लेखात पाकिस्तानच्या नेत्यांकडून सिंधू नदीच्या पाण्यावरून दिल्या जाणाऱ्या धमक्यांचाही उल्लेख आहे. अशा आक्रमक विधानांचा निषेध न करता केवळ भारतानेच शांततेचा मार्ग स्वीकारावा, अशी अपेक्षा योग्य नसल्याचे लेखक सांगतो. भारताने मानवतेच्या दृष्टिकोनातून अनेकदा मदत केली असली, तरी पाकिस्तानने त्याचा गैरफायदा घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे.

लेखकाच्या मते, पाकिस्तान हा भारताविरोधात सातत्याने कटकारस्थाने करणारा देश असून, त्याच्यावर विश्वास ठेवणे धोकादायक आहे. त्यामुळे पाकिस्तानने आपल्या दहशतवादी धोरणांचा त्याग करून प्रामाणिकपणे शांततेचा मार्ग स्वीकारल्याशिवाय दोन्ही देशांमध्ये स्थिर संबंध निर्माण होऊ शकत नाहीत.

लेखाच्या शेवटी भारतातील काही राजकीय नेत्यांवर पाकिस्तानबाबत सहानुभूती दाखवल्याचा आरोप करण्यात आला आहे. लेखकाचे मत असे आहे की, भारताने घेतलेले निर्णय राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने विचारपूर्वक असून, पाकिस्तानकडून सकारात्मक आणि विश्वासार्ह पावले उचलली गेल्याशिवाय भारताने आपल्या भूमिकेत बदल करू नये. अखेरीस, "टाळी एका हाताने वाजत नाही", या म्हणीचा आधार घेत लेखकाने शांतता आणि सलोखा प्रस्थापित करण्यासाठी दोन्ही देशांची समान आणि प्रामाणिक भूमिका आवश्यक असल्याचा निष्कर्ष मांडला आहे.

## ।। अभंगवाणी ।।



नामे स्नानसंध्या केलें क्रियाकर्म ।
त्याचा भवश्रम निवारला ।।१।।

आणिके दुरावली करिता खटपट ।
वाउगे बोभाट वर्माविण ।।२।।

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे.
एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# शेतकरी कर्जमाफीचा मार्ग मोकळा!

## 'अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजने'ची नियमावली जाहीर

**महाईन्यूज ।**
नागपूर

**सरकारने अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली आहे. दोन लाखांपर्यंत शेतकऱ्यांचे पीक कर्ज माफ करण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची कर्जमाफी देण्यात येणार आहे.**




१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२६ अखेर उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जखात्यांची एक किंवा अनेक बँकांकडील सर्व कर्ज खात्यांची मुद्दल व व्याजासह ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली एकत्रित थकबाकीची रक्कम दोन लाखांपेक्षा जास्त असेल तर अशा शेतकऱ्यांनी दोन लाखांवरील रक्कम भरल्यानंतर त्यांना लाभ मिळणार आहे. त्याच प्रमाणे नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांनाही ५० हजार रुपये प्रोत्साहन पर देण्यात येणार आहे. सरकारने पावसाळी अधिवेशनात यासाठी २० हजार कोटी रुपयांची तरतूदही केली आहे.

दोन लाख रुपये पर्यंतची थकीत रक्कम माफ होणार आहे. यासाठी प्रशासनाकडून थकबाकीदार शेतकऱ्यांची माहिती शासनाने घेतली. प्रशासनाकडून सरसकट सर्वच शेतकऱ्यांची माहिती पाठवण्यात आली. परंतु आता शासनाने कर्जमाफी देण्यासाठी काही अटी घातल्या आहेत. केंद्र सरकारची शेतकरी सन्मान योजना आणि राज्य शासनाकडून यापूर्वी देण्यात आलेल्या कर्जमाफीनुसार या अटींचा समावेश असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे लोकप्रतिनिधी, करदाते, शासकीय महामंडळावरील पदाधिकारी यांना याचा लाभ मिळणार नसल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे यांची नावे यादीतून नावे कमी करण्यात येणार असल्याचे बोलल्या जात आहे.

### शासनाने मागवली माहिती

सरकारकडून या महिन्यात कर्जमाफीचा प्रत्यक्ष लाभ मिळणार असल्याचे सांगण्यात आले. शेतकऱ्यांकडून व्याजाची आकारणी न करता कर्जपुरवठा करण्याच्या सूचना सरकारने सर्व बँकांना दिल्यात. कर्जमाफीचा लाभ देण्यासाठी शासनाने तयारी सुरू केली असून लोकप्रतिनिधी, करदात्यांसोबत विविध महामंडळ व कृषी उत्पन्न बाजार समिती आणि सहकार संस्थांवरील पदाधिकाऱ्यांची माहिती शासनाने मागवली आहे. विविध विभागाकडून संबंधित माहितीही पाठवण्यात येत असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली.

### लाभार्थी शेतकऱ्यांची यादी जाहीर होणार


सरकारकडे शेतकऱ्यांची यादी आहे. जे पात्र ठरणार नाहीत, त्यांची नावे यादीतून वगळण्यात येतील. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार पात्र शेतकऱ्यांची यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. ही यादी सहकार विभागासहसह बँकाकडेही देण्यात येणार असल्याचे सांगण्यात येते.

# 'जी-राम-जी' योजना सुरू मात्र 'मनरेगा'ची ४२ हजार कामे अपूर्ण

**महाईन्यूज ।** अहिल्यानगर

**केंद्र सरकारने ग्रामीण भागासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) बंद करून विकसित भारत रोजगार व अजिविका हमी अभियान (जी-राम-जी) सुरू केली असली तरी अहिल्यानगर जिल्ह्यात मनरेगाची ४१ हजार ८०८ कामे अपूर्ण राहिलेली आहेत. मनरेगातील एकुण ६० हजार २०८ कामे पूर्ण करण्यासाठी एप्रिलनंतर दोनदा मुदतवाढ देण्यात आली. मात्र या काळात केवळ १८ हजार ६०० कामे पूर्ण होऊ शकली.**






'जी-राम-जी' योजना सुरू करताना आता मनरेगामध्ये अपूर्ण राहिलेली कामे नवीन योजनेत हस्तांतरित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र योजना हस्तांतरण प्रक्रिये दरम्यान गेल्या पाच-सहा दिवसांपासून सर्वच कामे बंद अवस्थेत आहेत. मजुरांच्या कामाचे मस्टरही बंद ठेवण्यात आले आहे. जिल्हा प्रशासनाकडून ही माहिती उपलब्ध झाली.

मनरेगामधील प्रलंबित कामांची तालुकानिहाय संख्या पुढीलप्रमाणे अहिल्यानगर २२०४, अकोले २३१२, जामखेड ६५७२, कर्जत ६१४५, कोपरगाव २१०२, नेवासे ३२५७, पारनेर २३८८, पाथर्डी ३६४६, राहता १९९०, राहुरी १५७३, संगमनेर ३००२, शेवगाव ३०३५, श्रीगोंदा २४००, श्रीरामपूर ११८२.

केंद्र सरकारच्या नवीन 'जी-राम-जी' योजनेची सुरुवात जिल्हाधिकारी डॉ. पंकजा आशिया यांच्या उपस्थितीत करण्यात आली. ग्रामीण भागातील रोजगार निर्मिती, शाश्वत उपजीविका, नैसर्गिक साधन संपत्तीचे संवर्धन व सर्वांगीण विकासासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी बोलताना केले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, उपजिल्हाधिकारी वर्षा पवार, जिल्हा कृषी विकास अधिकारी सुधीर शिंदे, विभागीय वन आधिकारी अमोल जाधव, उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक सुभाष सातपुते, रेशीम विकास अधिकारी संदीप आगवणे, जिल्हा समन्वयक विकास घिगे आदी उपस्थित होते.

उपजिल्हाधिकारी वर्षा पवार यांनी सांगितले की, अकुशल काम करणाऱ्या प्रत्येक प्रौढ सदस्याला केंद्र सरकारकडून १२५ दिवसांच्या रोजगाराची हमी देण्यात आली आहे. अभियान अंतर्गत ३१८ प्रकारची कामे मंजूर असून मजुरीचा दर प्रति दिन ३१७ रुपये निश्चित करण्यात आला आहे.

# प्रशांत किशोर निवडणुकीच्या रिंगणात

## बांकीपूरमधून पोटनिवडणूक लढवणार, जन सुराज पक्षाची मोठी घोषणा

**महाईन्यूज । अमृतसर**

**बिहार विधानसभेच्या २०२५ मध्ये झालेल्या निवडणुकीत प्रशांत किशोर यांच्या जन सुराज पक्षाचा दारुण पराभव झाला होता. जन सुराज पक्षाला एकही जागा जिंकता आली नव्हती. एवढंच काय तर अनेक मतदारसंघात जन सुराज पक्षाच्या उमेदवारांचं डिपॉझिट देखील जप्त झाल्याचं पाहायला मिळालं. त्यानंतर बिहारच्या जनतेचा कौल मान्य असल्याची प्रतिक्रिया प्रशांत किशोर यांनी दिली होती. या घडामोडीनंतर आता मोठी बातमी समोर आली आहे.**




प्रशांत किशोर हे स्वत:निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याची माहिती समोर आली आहे. गेल्या काही दिवसांपासून प्रशांत किशोर हे बिहारमधील बांकीपूर मतदारसंघामधून पोटनिवडणूक लढवणार असल्याच्या चर्चा होत्या. अखेर आता प्रशांत किशोर बांकीपूर विधानसभा मतदारसंघातून पोटनिवडणूक लढवणार असल्याची घोषणा जन सुराज पक्षाने केली. या संदर्भातील वृत्त एएनआयने दिलं आहे.

बांकीपूर मतदारसंघामधून भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी विधानसभेची निवडणूक लढवली होती. या मतदारसंघातून त्यांचा विजय देखील झाला होता. मात्र, निवडणुकीनंतर काही महिन्यांतच नितीन नबीन हे भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाले आणि राज्यसभेवर निवडून आले. त्यामुळे नितीन नबीन यांनी बिहार विधानसभेच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. त्यामुळे बांकीपूर विधानसभा मतदारसंघात आता पोटनिवडणूक होत आहे.

या पार्श्वभूमीवर जन सुराज पक्षाने मोठी घोषणा केली. प्रशांत किशोर हे बांकीपूरची पोटनिवडणूक लढवणार असल्याचं जन सुराज पक्षाने रविवारी जाहीर केलं आहे. याबाबत जन सुराज पक्षाने सांगितलं की, पक्षाचे संस्थापक प्रशांत किशोर बांकीपूर विधानसभा मतदारसंघातून पोटनिवडणूक लढवणार आहेत. याबाबत गेल्या काही दिवसांपासून चर्चा सुरू होती, त्यानंतर आज याबाबत घोषणा करण्यात आली आहे.

दरम्यान, निवडणूक रणनीतिकार ते राजकारणी बनलेल्या प्रशांत किशोर यांची ही पहिलीच निवडणूक आहे. याआधी बिहार विधानसभा निवडणुकीत त्यांनी निवडणूक लढवावी अशा चर्चा होत्या. मात्र, ते प्रत्यक्षात निवडणुकीच्या रिंगणात उतरले नव्हते.

### पोटनिवडणूक कधी होणार?

बिहारमधील बांकीपूरसह देशभरातील ३ जागांसाठी ३० जुलै रोजी पोटनिवडणूक होणार असून ३ ऑगस्ट रोजी मतमोजणी होणार आहे. दुसरीकडे बिहारचे माजी मंत्री तेज प्रताप यादव यांच्या जनशक्ती जनता दलाने सामाजिक कार्यकर्त्या वीणा मानवी यांना बांकीपूर पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी जाहीर केली आहे.

# प्रेयसीसाठी पार केली भारत-पाक सीमा! २ मिनिटांची भेट अन्...

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**प्रेम माणसाला काय करायला लावेल याचा काही नेम नाही. अशीच एक फिल्मी वाटणारी, पण खरीखुरी घटना जम्मू-काश्मीरच्या 'लाईन ऑफ कंट्रोल' वर घडली. 'पाकिस्तानव्याप्त काश्मीर' मध्ये राहणाऱ्या एका तरुणाने फक्त आपल्या प्रेयसीला भेटण्यासाठी कोणतीही पर्वा न करता थेट सीमा ओलांडली. मात्र, नियतीला काही वेगळंच मान्य होतं. या धाडसानंतर अवघ्या एका महिन्यातच या प्रियकराला पुन्हा पाकिस्तानात परत पाठवण्यात आलं आहे.**



### शेवटची भेट आणि डोळ्यातले अश्रू...

शनिवारी दुपारी साडेबारा वाजता 'कमन पोस्ट' येथे भारतीय अधिकाऱ्यांनी झिशानला पाकिस्तानी सैनिकांच्या स्वाधीन केले. पण, त्याला परत पाठवण्यापूर्वी भारतीय प्रशासनाने एक संवेदनशील पाऊल उचलले. झिशानला त्याची प्रेयसी इरम आणि तिच्या कुटुंबाला भेटण्याची परवानगी देण्यात आली. "आम्हाला त्याला जाण्यापूर्वी फक्त दोन ते तीन मिनिटे भेटू दिले. तो काहीच बोलू शकला नाही, आम्ही तिथे असेपर्यंत तो फक्त ढसाढसा रडत होता," अशी भावनिक प्रतिक्रिया इरमने दिली. दोघांची ही भेट अत्यंत भावुक होती. प्रेम पूर्ण होऊ शकले नाही तरी, भारताने दाखवलेल्या कायदेशीर आणि मानवतावादी दृष्टिकोनामुळे झिशान सुखरूप आपल्या घरी परतला आहे.

झिशान अहमद मीर असं या २२ वर्षीय तरुणाचं नाव असून तो 'पाकिस्तानव्याप्त काश्मीर' मधील 'पनकेडी' गावचा रहिवासी आहे. झिशानचं उरीमध्ये राहणाऱ्या इरम मजीद नावाच्या मुलीवर जीवापाड प्रेम जडलं होतं. या दोघांची ओळख 'स्नॅपचॅट' (SNAPCHAT) या सोशल मीडिया ॲपवर झाली होती. प्रेम इतकं रंगलं की, इरमला डोळे भरून पाहण्यासाठी झिशानने ३१ मे रोजी थेट उरी सेक्टरमधून 'लाईन ऑफ कंट्रोल' पार केली आणि तो भारतात दाखल झाला.

झिशानने सीमा पार करताच भारतीय लष्कराने त्याला 'सिलिकोट' या प्रतिबंधित आणि कुंपण घातलेल्या सीमावर्ती गावातून ताब्यात घेतले. सुरुवातीला तो कोणी संशयित घुसखोर असावा, असा संशय होता. मात्र, लष्कराने आणि गुप्तहेर यंत्रणांनी जेव्हा त्याची कसून चौकशी केली, तेव्हा एक धक्कादायक पण भावनिक सत्य समोर आलं. झिशानचा कोणताही चुकीचा किंवा देशविरोधी हेतू नव्हता, तो केवळ त्याच्या प्रेयसीला भेटायला आला होता.



लष्कराने खात्री पटल्यानंतर झिशानला पुढील कायदेशीर कारवाईसाठी पोलिसांच्या हवाली केले. बेकायदेशीर घुसखोरी केल्याप्रकरणी पोलिसांनी त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवून त्याला बारामुल्ला येथील तुरुंगात पाठवले. तीन दिवसांपूर्वी पोलिसांनी न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. उरी न्यायालयाने संपूर्ण प्रकरणाची पार्श्वभूमी आणि झिशानचा निष्पाप हेतू लक्षात घेऊन हे प्रकरण निकाली काढले आणि त्याच्या मायदेशी रवानगीचे आदेश दिले.



# आमिर खान तिसऱ्यांदा लग्नबेडीत

बॉलिवूड परफेक्टनिश आमिर खान आज तिसऱ्यांदा लग्नबंधनात अडकला आहे. वयाच्या ६१ व्या वर्षी ४७ वर्षीय गौरी स्प्रॅटबरोबर त्याने लग्न केले आहे. या कार्यक्रमाला सर्व कुटुंबिय हजर होते. गेले अनेक दिवस मिडीयामध्ये आमिरच्या लग्नाच्या चर्चांना उधाण आले होते. त्याने आज एका खासगी समारांभात झालेल्या लग्नाने पूर्णविराम दिला आहे. मुंबईतील वांद्रे येथील त्यांच्या घरी एका अत्यंत खाजगी घरगुती सोहळ्यात त्यांनी कायदेशीररित्या लग्न केले. आज मुंबई येथे ५ जुलै रोजी लेडी लव्ह गौरी स्प्रॅटबरोबर रजिस्टर लग्न करून नवीन नात्याचा शुभारंभ केला आहे. रिपोर्टनुसार या लग्नानंर दोघांच्याही डोळयात आनंदाश्रू तरळले. दोघेही या सोहळयानंतर खूष दिसत होते. या लग्नाला आमिरचा परिवार व जवळचे दोस्त उपस्थित होते. आमिरने मुस्लिम रिवाजाप्रमाणे निकाह न करता मॅरेज ॲक्टनुसार रजिस्टर मॅरेज केले आहे. ५ जुलै दुपारी १२.४५ वाजता दोघांनीही लग्नाच्या कागदपत्रावर सह्या केल्या, गौरीचे वय सध्या ४७ वर्षे आहे. गौरी स्प्रॅट ही मूळची बेंगळुरूची असून ती फॅशन, ब्युटी क्षेत्रात कार्यरत आहे.

# श्रीलीलाचा बॉलिवूड डेब्यू ठरला!

पुष्पा २'मधील गाजलेल्या आयटम साँगमुळे देशभरात लोकप्रिय झालेली दाक्षिणात्य अभिनेत्री श्रीलीला लवकरच बॉलिवूडमध्ये पदार्पण करण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे. खरंतर श्रीलीला तिच्या वैयक्तियक आयुष्यामुळे देखील सतत चर्चेत असते. साऊथचा पडदा गाजवल्यानंतर आता तिच्या बॉलिवूड डेब्यू चित्रपटाची मोठी उत्सुकता तिच्या चाहत्यांना लागली आहे. अशातच तिच्या पहिल्या बॉलिवूड चित्रपटाबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे. सुरुवातीला अशी चर्चा होती की ती अभिनेता कार्तिक आर्यनसोबत पदार्पण करेल. मात्र, आता तिच्या बॉलिवूड एन्ट्रीचा मार्ग बदलल्याचे बोलले जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कार्तिक आर्यन आणि अनुराग बासू यांच्या आगामी रोमँटिक चित्रपटाचे काम काही कारणामुळे पुढे ढकलण्यात आले आहे. परिणामी श्रीलीलाचे त्या चित्रपटातून होणारे पदार्पणही लांबणीवर पडल्याचे सांगितले जात आ हे . दरम्यान, आता श्रीलीला अभिनेता सैफ अली खानचा मुलगा इब्राहिम अली खानसोबत 'दिलर' या चित्रपटातून हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण करू शकते, अशी जोरदार चर्चा आहे.



# बॉलिवूडमध्ये महिलांसाठी अजूनही आव्हाने आहेत



अभिनेत्री कृती सेनन सध्या तिच्या तिने बॉलिवूडमधील महिलांना आपले मत मांडले आहे. तिच्या मते, कलाकारांच्या तुलनेत वेगळ्या नजरेने अनेकदा 'अवघड' किंवा 'जास्त मुलाखतीत कृतीने आणि चित्रपटसृष्टी सर्व क्षेत्रांपैकी सामना करावा महिलांसाठी तिने नमूद कथा ही मुख्यतः अभिनेत्रीची भूमिका मर्यादित

'कॉकटेल २' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. याचदरम्यान येणाऱ्या अडचणी आणि लिंगभेदाबाबत स्पष्टपणे चित्रपटसृष्टीत आजही महिला कलाकारांना पुरुष पाहिले जाते. तसेच प्रश्न विचारणाऱ्या अभिनेत्रीला प्रश्न विचारणारी' अशी प्रतिमा दिली जाते. एका सांगितले की, तिने मॉडेलिंग, अभियांत्रिकी शिक्षण अशा विविध क्षेत्रांत काम केले आहे. मात्र या बॉलिवूडमध्येच तिला सर्वाधिक आव्हानांचा लागला. करिअरच्या सुरुवातीच्या काळात संधी आजच्या तुलनेत खूपच कमी होत्या, असेही केले. कृतीच्या मते, पूर्वी अनेक चित्रपटांची नायकाभोवती फिरायची. अशा चित्रपटांमध्ये बहुतेक वेळा केवळ नायकाच्या प्रेमिकेपुरती असायची. मात्र गेल्या काही वर्षांत चित्रपटसृष्टीत सकारात्मक बदल झाले आहेत. महिलांसाठी अधिक सक्षम, अर्थपूर्ण आणि महत्त्वाच्या भूमिका लिहिल्या जात आहेत. तरीही लिंगभेद पूर्णपणे संपलेला नाही, असे तिचे मत आहे. चित्रपटांच्या चित्रीकरणादरम्यान पुरुष आणि महिला कलाकारांसाठी वेगवेगळे निकष लावले जातात, असेही कृतीने सांगितले. ती स्वतः भूमिका आणि दृश्यांबाबत दिग्दर्शक किंवा निर्मात्यांना प्रश्न विचारते.

# फ्रान्स-पराग्वे खेळाडू भिडले

## एम्बापेने गोलरक्षकाशी हस्तांदोलन नाकारले, पाठीवर मारला चेंडू

**महाईन्यूज । मँचेस्टर**

**फ्रान्स आणि पराग्वे यांच्यातील 'राऊंड ऑफ-१६' सामन्याची अंतिम शिट्टी वाजताच मैदानावर तणाव निर्माण झाला. दोन्ही संघांचे खेळाडू समोरासमोर आले. त्यांच्यात काही वेळ धक्काबुक्की पाहायला मिळाली. सामन्यादरम्यान फ्रान्सचा कर्णधार किलियन एम्बाप्पे आणि पराग्वेचा गोलकीपर ऑरलँडो गिल यांच्यातही वाद झाला. एम्बाप्पेने गिलशी हस्तांदोलन केले नाही.**



फ्रेंच स्टार एम्बाप्पेने यावर कोणतीही प्रतिक्रिया न देता आपल्या संघासोबत विजयाचा जल्लोष सुरू ठेवला. आता फ्रान्सचा सामना क्वार्टर फायनलमध्ये (उपांत्यपूर्व फेरीत) मोरोक्कोविरुद्ध होईल, तर पराग्वेचा या विश्वचषकातील प्रवास इथेच संपला आहे.

पराग्वेने आपल्या भक्कम बचावाच्या (डिफेन्स) जोरावर फ्रान्सच्या स्टार खेळाडूंना मोकळेपणाने खेळण्याची संधी दिली नाही. अखेर ७० व्या मिनिटाला डिझायर डुए बॉक्सच्या आत फौलचा शिकार झाला. रेफरीने आधी खेळ सुरू ठेवला, पण VAR (व्हिडिओ असिस्टंट रेफरी) समीक्षेनंतर फ्रान्सला पेनल्टी बहाल करण्यात आली. एम्बाप्पेने कोणतीही चूक न करता चेंडू गोलपोस्टमध्ये धाडला आणि हाच एकमेव गोल फ्रान्सच्या १-० अशा विजयाचा पाया ठरला. या स्पर्धेतील हा त्याचा सातवा आणि विश्वचषक कारकिर्दीतील १९ वा गोल ठरला. यासह त्याने 'गोल्डन बूट'च्या शर्यतीत लिओनेल मेस्सीची बरोबरी केली आहे.

सामन्याची अंतिम शिट्टी वाजल्यानंतर ऑरलँडो गिल हा एम्बाप्पेचे अभिनंदन करण्यासाठी त्याच्याजवळ गेला आणि हात मिळवण्याचा प्रयत्न केला. परंतु, एम्बाप्पेने त्याच्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत पुढे जाणे पसंत केले. यामुळे गिल प्रचंड संतापला आणि त्याने रागाच्या भरात मॅच बॉल एम्बाप्पेच्या पाठीच्या दिशेने फेकला. चेंडू पाठीवर लागूनही एम्बाप्पेने कोणताही पलटवार केला नाही, ज्यामुळे वाद अधिक वाढला नाही. ही घटना सोशल मीडियावर वेगाने व्हायरल झाली असून सामन्यानंतर चर्चेचा मोठा विषय बनली आहे.

सामन्यानंतर एम्बाप्पे म्हणाला की, फ्रान्सला आधीच ठाऊक होते की हा सामना सोपा असणार नाही. सामना कसा होणार आहे याची आम्हाला पूर्ण कल्पना होती. गरज पडल्यास आम्ही आमचे हातही घाण करू (कठोर खेळ करू). आम्ही खराब फुटबॉलही खेळू शकतो. त्यांना वाटले होते की आम्ही फक्त सुंदर फुटबॉल खेळायला आलो आहोत, पण आम्हाला प्रत्येक प्रकारचा खेळ खेळता येतो.

### एम्बाप्पे आणि गोमेझ यांच्यात जोरदार वाद

सामन्यात ७० मिनिटांपर्यंत दोन्ही संघांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळाली. यादरम्यान अनेक वेळा खेळाडूंमध्ये वाद होऊन ते एकमेकांना भिडले. एका क्षणी एम्बाप्पे आणि पराग्वेचा दिएगो गोमेझ यांच्यात जोरदार वाद झाला.यानंतर पराग्वेचे खेळाडू एम्बाप्पेला धक्का देऊ लागले. हे पाहून फ्रान्सचे खेळाडूही तिथे धावून आले आणि त्यांच्यात जोरदार धक्काबुक्की झाली. रेफरी सुरुवातीला मध्यस्थी करत एम्बाप्पेला बाजूला घेऊन जाताना दिसले, पण जेव्हा दोन्ही बाजूंचे खेळाडू एकत्र आले, तेव्हा रेफरी बाजूला झाले.

# दुसऱ्या टी-20 सामन्यात इंग्लंडचा भारतावर 4 विकेट्सनी विजय

**महाईन्यूज । मँचेस्टर**

**भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-20 मालिकेतील दुसऱ्या सामन्यात टीम इंडियाला पराभवाचा धक्का बसला. ओल्ड ट्रॅफर्डच्या मैदानावर झालेल्या लढतीत भारताने इंग्लंडसमोर 191 धावांचे आव्हान उभे केले होते, पण पहिले दोन गडी शून्यावर बाद झाल्यानंतरही इंग्लंडने दमदार फलंदाजी करत 19 व्या षटकातच 4 विकेट्स राखून लक्ष्य गाठले आणि मालिकेत वर्चस्व कायम राखले.**



विशेष म्हणजे, आयर्लंडविरुद्ध दोन्ही सामने गमावल्यानंतर इंग्लंडविरुद्ध पहिला सामना पावसामुळे रद्द झाला होता. दुसऱ्या सामन्यात मात्र भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला. उभय संघातील तिसरा सामना दि. 7 जुलै रोजी होईल.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या टीम इंडियाला 15 वर्षीय पदार्पणवीर वैभव सूर्यवंशी आणि अभिषेक शर्मा यांनी दमदार सुरुवात करून दिली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी अवघ्या 4.5 षटकांत 50 धावांची भागीदारी रचली. वैभव 14 धावा करुन बाद झाला. यानंतर इशान किशनने 49 धावांचे योगदान दिले तर अभिषेक 43 धावा करुन बाद झाला. याशिवाय, तिलक वर्माने 11 चेंडूत नाबाद 24 धावांचे योगदान दिले. कर्णधार श्रेयस अय्यरने 22 चेंडूत 37 धावांची खेळी केली. या जोरावर भारताने 7 बाद 190 धावा केल्या.

टीम इंडियाने विजयासाठी दिलेले 191 धावांचे टार्गेट इंग्लंडने 19 व्या षटकांतच पूर्ण केले. जेकब बेथेलने 46 चेंडूत नाबाद 76 धावांची खेळी करत संघाच्या विजयात मोलाचे योगदान दिले. त्याच्या खेळीत 5 चौकार, 5 षटकारांचा समावेश होता. याशिवाय, हॅरी ब्रूकने 15 चेंडूत 39 तर टॉम बॅन्टने 32 चेंडूत 39 धावा केल्या. बेथेलला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले. भारताच्या अर्शदीप सिंगने 40 धावांत 3 बळी मिळविले.

महिलांमध्ये सुरत येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-20 सामन्यातून पदार्पण केले तेव्हा शेफालीचे वय 15 वर्षे 239 दिवस होते, तर सूर्यवंशीचे वय 15 वर्षे 91 दिवस आहे. या सामन्यात वैभवने दोन सणसणीत षटकार मारत वरिष्ठ संघातून आंतरराष्ट्रीय पदार्पण केले. जरी भारताला या सामन्यात पराभव पत्करावा लागला, तरी 15 वर्षीय वैभव सूर्यवंशीच्या धाडसी पदार्पणाने भारतीय क्रिकेटला भविष्यासाठी मोठी आशा मिळाली आहे. आता मालिकेत बरोबरी साधण्यासाठी टीम इंडियासमोर 7 जुलै रोजी होणारा तिसरा सामना 'करा किंवा मरा' असा ठरणार आहे.

### वैभव सूर्यवंशीने मोडला सचिन तेंडुलकरचा विक्रम

इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या टी-20 सामन्यासाठी भारताच्या अंतिम अकरा खेळाडूंच्या संघात वैभव सूर्यवंशीचा समावेश करण्यात आला आणि 15 वर्षीय वैभव सूर्यवंशी भारतासाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळणारा सर्वात तरुण खेळाडू ठरला. इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या टी-20 सामन्यात पदार्पणाची संधी देण्यात आली. याआधी सचिन तेंडुलकरने नोव्हेंबर 1989 मध्ये कराची येथे पाकिस्तानविरुद्धच्या कसोटी सामन्यातून वयाच्या 16 वर्षे 205 व्या दिवशी पदार्पण केले होते.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज
ePaper
epaper.mahaenews.com
। सोमवार ।
दि. 06 जुलै 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# बीआरटीएस मार्गावर निओ मेट्रो प्रस्ताव

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

पिंपरी-चिंचवड शहरातील पुणे-नाशिक महामार्ग ते मुंबई बंगळुर महामार्गास जोडणाऱ्या बीआरटीएस मार्गावर (इलेक्ट्रिक रॅपिड ट्रॉन्झिट सिस्टीम) इलेक्ट्रिक मेट्रो सुरू करण्याचे महापालिका प्रशासनाचे नियोजन आहे. त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) महामेट्रो तयार करणार आहे. बीआरटीएस मार्गास प्रवाश्यांचा प्रतिसाद नसल्याने निओ मेट्रोचा प्रस्ताव पुढे करण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात पिंपरीहून स्वारगेट अशी मेट्रो धावत आहे. पिंपरी ते निगडी या विस्तारीत मेट्रो मार्गाचे काम वेगात सुरू आहे. तसेच, निगडी ते चाकण या नवीन मार्गाचा सुधारित डीपीआर तयार करण्यात आला आहे. मात्र, तो मंजुरीअभावी महापालिकेत धूळखात पडून आहे.

शहराचे नागरीकरण वेगाने वाढत असून, शहरातील नागरिकांना शहरांतर्गत प्रवासासाठी सार्वजनिक वाहतूक सुविधा महापालिकेने उपलब्ध करून देण्याचा सूचना राज्य शासनाने दिल्या आहेत. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली 11 एप्रिल 2025 ला मुंबईत बैठक झाली होती. त्या शहरातील नवीन मेट्रो मार्ग तयार करण्याबाबत चर्चा झाली होती. बीआरटीएस मार्गास प्रवाश्यांचा अल्प प्रतिसाद आहे. त्या मार्गावर इलेक्ट्रिक मेट्रो सुरू करण्याचा प्रस्ताव महामेट्रोने दिला होता.

त्यानुसार, पुणे-नाशिक महामार्ग ते मुंबई बंगळुर महामार्गास जोडणाऱ्या भोसरीतील गोडाऊन चौक, नाशिक महामार्ग, कुदळवाडी चौक, ऑटो क्लस्टर, काळेवाडी फाटा चौक, जगताप डेअरी चौक, वाकड चौक या बीआरटीएस मार्गावर मेट्रो मार्गाचे नियोजन करण्यात आले आहेत. त्याचा डीपीआर महामेट्रो तयार करणार आहे. डीपीआर तयार करण्यासाठी महामेट्रोने 85 लाख 41 हजार 985 रुपये खर्च असल्याचे कळवले आहे. त्या खर्चास मान्यता देण्याचा प्रस्ताव येत्या स्थायी समितीसमोर ठेवण्यात आला आहे.

## असा आहे नवा मेट्रो मार्ग

गोडाऊन चौक ते वाकड चौक असा प्रस्तावित मेट्रो मार्ग नागरिकांसाठी मोठा दिलासा ठरणार आहे. या मार्गावर नाशिक महामार्ग, कुदळवाडी चौक, ऑटो क्लस्टर, काळेवाडी फाटा आणि जगताप डेअरी चौक यांसारखी महत्त्वाची ठिकाणे जोडली जाणार आहेत. त्यामुळे औद्योगिक, व्यावसायिक आणि निवासी भागांना जलद सार्वजनिक वाहतुकीची सुविधा मिळेल. वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होऊन प्रवाशांचा वेळही मोठ्या प्रमाणात वाचेल.





# एकविरा देवी मार्गावर पुराचे पाणी

## पावसाळ्यापूर्वी नालेसफाई प्रभावीपणे न झाल्याने परिस्थिती अधिक गंभीर

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**मुसळधार पावसामुळे कार्ला येथून एकविरा देवी मंदिराकडे जाणारा प्रमुख मार्ग पाण्याखाली गेला आहे. रस्त्यावरून वेगाने वाहणाऱ्या पाण्यामुळे या मार्गाला नदीचे स्वरूप आले असून वाहनांची ये-जा पूर्णपणे ठप्प झाली आहे. वेहेरगाव, दहिवली आणि पडवळवाडी परिसरातील नागरिक, विद्यार्थी, कर्मचारी तसेच रुग्णांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.**



स्थानिकांच्या मते, ही समस्या केवळ अतिवृष्टीमुळे निर्माण झालेली नाही. रस्त्यालगत झालेले अनधिकृत बांधकाम, मुरूम-मातीचे भराव आणि नैसर्गिक जलमार्गांमध्ये झालेला अडथळा यामुळे पावसाचे पाणी रस्त्यावर वळत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. पावसाळ्यापूर्वी नालेसफाई प्रभावीपणे न झाल्याने परिस्थिती अधिक गंभीर झाल्याचेही सांगण्यात येत आहे.

पुराच्या पाण्यातून मार्ग काढताना नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. विशेषतः शाळकरी मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आपत्कालीन वैद्यकीय मदतीची गरज असलेल्या रुग्णांसाठी हा मार्ग धोकादायक ठरत आहे. दरवर्षी पावसाळ्यात अशीच स्थिती निर्माण होत असतानाही कायमस्वरूपी उपाययोजना का होत नाहीत, असा प्रश्न स्थानिकांनी उपस्थित केला आहे.

नागरिकांनी प्रशासनाकडे तातडीने रस्त्यावरील पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था करण्याची मागणी केली आहे. तसेच नालेसफाई पूर्ण करणे, नैसर्गिक पाण्याचे मार्ग मोकळे करणे, अनधिकृत भरावांची चौकशी करणे आणि पुरस्थिती टाळण्यासाठी दीर्घकालीन नियोजन राबविणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

भातशेतीचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढावले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी तातडीने पंचनामे करून भरपाई देण्याची मागणी केली आहे. तसेच जलमार्ग अडविणाऱ्या भरावांवर कारवाई करून पाण्याचा नैसर्गिक प्रवाह पूर्ववत करावा आणि संबंधितांची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. "लहान बांधकामांवर तत्काळ कारवाई केली जाते; मात्र प्रभावशाली व्यक्तींच्या अनधिकृत बांधकामांकडे दुर्लक्ष का केले जाते?" असा सवाल शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे. स्थानिक प्रशासनाने तातडीने पाहणी करून जबाबदारी निश्चित करत कायमस्वरूपी उपाययोजना राबवाव्यात, अशी एकमुखी मागणी नागरिक आणि शेतकऱ्यांनी केली आहे.

### भरावांमुळे शेतीत पाणी


कार्ला परिसरातील अनधिकृत बांधकामे आणि मुरूम-मातीच्या भरावांमुळे नैसर्गिक पाण्याचा प्रवाह अडल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. परिणामी पुराचे पाणी शिलाटणे आणि दहिवली परिसरातील शेतांमध्ये शिरले असून नुकतीच लावलेली भातरोपे पाण्याखाली गेल्याची माहिती आहे. यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले असून प्रशासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी होत आहे. तसेच संबंधित अनधिकृत बांधकामे आणि भरावांवर कठोर कारवाई करून नैसर्गिक नाल्यांचा प्रवाह पूर्ववत करण्याची मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

# डॉ. सुहास कांबळे यांच्या वाढदिवसानिमित्त डिजिटल नागरिक सेवा उपक्रम

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नगरसेवक व शहर सुधारणा समितीचे सदस्य डॉ. सुहास कांबळे यांच्या वाढदिवसानिमित्त प्रभाग क्रमांक ८ मधील नागरिकांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या तक्रार निवारण पोर्टल आणि सोसायटी मॅनेजमेंट वेब ॲपचे उद्घाटन करण्यात आले. या उपक्रमामुळे नागरिकांच्या दैनंदिन तक्रारी, नागरी सुविधा, सोसायटी व्यवस्थापनाशी संबंधित प्रश्न यांचे डिजिटल पद्धतीने त्वरित निवारण होण्याचा मार्ग आता सहजसोपा झाला आहे.**





"प्रभागातील नागरिकांच्या तक्रारी वेळेत, पारदर्शक व प्रभावीपणे मार्गी लागाव्यात, यासाठी आम्ही तक्रार निवारण पोर्टल व सोसायटी मॅनेजमेंट वेब ॲप सुरू केले आहे. डिजिटल माध्यमातून प्रशासन व नागरिक यांच्यात सुसंवाद व समन्वय राखणे अधिक सुकर होईल आणि सेवा अधिक गतिमान होतील. प्रभाग क्रमांक 8 मधील नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन आम्ही करतो. नागरी सुविधांसह आरोग्यपूरक रक्तदान व पर्यावरणपूरक वृक्षारोपण ही काळाची गरज आहे. म्हणून अनावश्यक खर्च टाळून लोकहिताचे उपक्रम आम्ही राबविले.

**- डॉ. सुहास कांबळे, नगरसेवक, शहर सुधारणा समिती सदस्य, पिं. चिं. मनपा.**

या पोर्टल व वेब ॲपच्या माध्यमातून रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, वीज, ड्रेनेज, सोसायटीतील अंतर्गत समस्या अशा विविध बाबींवरील तक्रारी नोंदवता येणार असून, संबंधित विभागांपर्यंत त्या थेट पोहोचतील. यामुळे पारदर्शकता वाढण्यासोबतच तक्रारींच्या निवारणाचा कालावधी कमी होण्यास मदत होणार आहे.

वाढदिवसानिमित्त सामाजिक भान जपत डॉ. कांबळे यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबिर आणि वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजनही करण्यात आले. अनावश्यक खर्च टाळून आरोग्यपूरक व पर्यावरणपूरक उपक्रम राबविल्याबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, या उपक्रमांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या कार्यक्रमास पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे नगरसेवक निखिल बोऱ्हाडे, डॉ. विलास साबळे, चिखली–मोशी सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे, संदिपान झोंबाडे, संतोष निसर्गंध, अझहर खान, प्रा. संजीव सूर्यवंशी, अशोक मोरे, बाबाजी कळमकर, ॲड. अतुल कांबळे, संदिप कुंभार, विश्वनाथ टेमगिरे, पंकज पवार यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक व मान्यवर उपस्थित होते.

डिजिटल प्रशासन, सामाजिक जाणीव आणि पर्यावरण संवर्धन यांचा समन्वय साधणारा हा उपक्रम प्रभाग क्रमांक ८ साठी दिशादर्शक ठरेल, अशी भावना यावेळी उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली.

या पोर्टलमुळे नागरिकांना त्यांच्या तक्रारींची स्थिती ऑनलाइन पाहता येणार असून, प्रत्येक तक्रारीवर होणाऱ्या कार्यवाहीचा मागोवा घेणेही सुलभ होणार आहे. नागरिकांचा थेट सहभाग वाढवून प्रशासन अधिक उत्तरदायी आणि लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

# आशियाई स्पर्धेत तिरंदाज पिंपरी-चिंचवडच्या कन्या

## भारतीय संघात स्वराज्य तिरंदाजी अकादमीच्या ४ खेळाडूंची दमदार निवड

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**"जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रम यांच्या बळावर यशाचे सुवर्णलक्ष्य गाठता येते," याची प्रचिती पुन्हा एकदा पिंपरी-चिंचवडच्या गुणी मुलींनी आपल्या उल्लेखनीय कामगिरीतून करून दिली आहे. पिंपळे गुरव येथील सह्याद्री स्पोर्ट्स फाउंडेशन संचलित 'स्वराज्य तिरंदाजी अकादमी'तील चार होतकरू तिरंदाज मुलींनी युएई (UAE) येथे होणाऱ्या आगामी आशियाई युवा तिरंदाजी अजिंक्यपद (Asian Youth Championship) स्पर्धेसाठी भारतीय संघात स्थान मिळवले आहे. या अभूतपूर्व यशामुळे शहराच्या क्रीडा जगतातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.**




या दैदिप्यमान यशामागे खेळाडूंच्या अथक परिश्रमांसोबतच त्यांचे प्रशिक्षक श्री. कुणाल तावरे यांचे कुशल मार्गदर्शन आणि दूरदृष्टीचे मोलाचे योगदान आहे. तावरे यांच्या मार्गदर्शनाखाली यापूर्वीही अनेक खेळाडूंनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

याशिवाय, सह्याद्री स्पोर्ट्स फाउंडेशनला दर्जेदार क्रीडा मैदान उपलब्ध करून देण्यासाठी या प्रभागातील सर्व नगरसेवकांनी मोलाचे सहकार्य केले. तसेच, आमदार श्री. शंकरशेठ जगताप आणि श्री. महेशभाऊ लांडगे यांनी मैदान उपलब्ध करून देण्याबरोबरच तिथे राष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधा उभारण्यासाठी विशेष प्रयत्न केले. आधुनिक सुविधा आणि उत्कृष्ट सरावाचे वातावरण लाभल्यामुळेच खेळाडूंना आपल्या गुणवत्तेचा सर्वोत्तम आविष्कार करता आला, असे समाधान खेळाडूंचे पालक डॉ. अमोल बिडकर, डॉ. शेंडे, श्री. गावडे, श्री. प्रसाद आणि श्री. जाधव यांनी व्यक्त केले आहे.

### महाराष्ट्राच्या क्रीडाविश्वात आनंदाचे वातावरण

या यशामुळे पिंपरी-चिंचवड शहरासह संपूर्ण महाराष्ट्राच्या क्रीडाविश्वात आनंदाचे व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. आगामी आशियाई युवा अजिंक्यपद स्पर्धेतही या चारही कन्या भारतीय तिरंग्याचा गौरव उंचावत देशासाठी पदकांची मोठी कमाई करतील, असा ठाम विश्वास क्रीडाप्रेमी आणि नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे.

### विविध गटांतून 'या' खेळाडूंची झाली निवड

राष्ट्रीय स्तरावरील सातत्यपूर्ण आणि उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर या चारही खेळाडूंनी भारतीय संघात मानाची निवड मिळवली आहे:

- कु. धारा मानसी अमोल बिडकर (सब ज्युनियर कंपाऊंड गट)
- कु. वैदेही जाधव (सब ज्युनियर कंपाऊंड गट)
- कु. श्रावरी शेंडे (ज्युनियर रिकर्व गट)
- कु. प्रियांका प्रसाद (ज्युनियर कंपाऊंड गट)

# चिखली-मोशी भागाला दिलासा; २२ केव्ही सबस्टेशनला मंजुरी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**चिखली परिसरामध्ये मागील काही दिवसांपासून वीजपुरवठा खंडित होण्याची समस्येत वाढ झाली असून, नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. मात्र, आता चिखलीकरांची यामधून लवकरच सुटका होणार असून, येथील वीज यंत्रणेचे सक्षमीकरण करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल महावितरणतर्फे उचलण्यात आले आहे.**




### आठ महिन्यांत उभारणार नवीन सबस्टेशन

संबंधित एजन्सीला हे काम पूर्ण करण्यासाठी ६ महिन्यांची मुदत देण्यात आली असून, सर्व परवानग्यांसह येत्या ८ महिन्यांत हे सबस्टेशन पूर्णपणे कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट महावितरणाने ठेवले आहे. सध्या चिखली परिसरातील वीजपुरवठा एकाच मुख्य केबलवर अवलंबून असल्याने यंत्रणेवर ताण येत असून, वीज खंडित होण्याचे प्रमाण या भागात वाढले आहे. हे नवीन स्विचिंग सबस्टेशन उभारल्यानंतर एका केबलऐवजी चार वेगवेगळ्या केबल्स जोडल्या जातील, ज्यामुळे विजेची क्षमता वाढेल आणि भार कमी होईल. परिणामी, परिसरातील वीज खंडित होण्याच्या समस्या सुटेल आणि चिखलीकरांना सुरळीत आणि अखंडित वीजपुरवठा मिळण्याचा मार्ग मोकळा होईल.

'टाउन डीपीआर'अंतर्गत चिखली येथे २२ केव्ही क्षमतेच्या नव्या 'स्विचिंग सबस्टेशन'ला मंजुरी मिळाली असून, यामुळे परिसरातील विजेचा ताण कमी होण्यास मोठी मदत होणार आहे. सध्या या प्रकल्पाची निविदाप्रक्रिया अंतिम टप्प्यात आली असून, मुख्य कार्यालय स्तरावर 'कमर्शियल बीड' होणार आहे. या निविदेमध्ये पात्र ठरलेल्या संस्थेला पुढील काही दिवसांत 'लेटर ऑफ अवॉर्ड' मिळून कामाची मंजुरी प्राप्त होईल.

या संपूर्ण प्रकल्पाचे काम प्रत्यक्षात ऑक्टोबर महिन्यानंतर सुरू होणार असल्याचे महावितरणकडून सांगण्यात येत आहे. कारण पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर महापालिकेकडून सध्या खोदकामाची परवानगी दिली जात नाही. ऑक्टोबर महिन्यापर्यंत महापालिकेची आवश्यक ती खोदकाम व केबल टाकण्याची परवानगी घेण्याचे प्रशासकीय काम पूर्ण केले जाईल आणि त्यानंतर प्रत्यक्ष कामाला गती दिली जाईल.

'स्विचिंग सबस्टेशन'ची निविदाप्रक्रिया पूर्ण झाली असून, लवकरच प्रत्यक्ष कामाला गती येईल. आवश्यक बाबींची पूर्तता झाल्यावर महावितरणकडून नेमण्यात आलेल्या कंत्राटदाराला सदर काम ६ महिन्यांच्या अवधीत पूर्ण करणे बंधनकारक असेल, असा विश्वास महावितरण विभागाचे कार्यकारी अभियंता विश्वनाथ लहाणे यांनी व्यक्त केला आहे.


आता
डॉ. सुहास कांबळे
जलद तक्रार निवारण
करण्यासाठी
24/7 ऑनलाईन
पोर्टल &
ॲप्लिकेशन
वर उपलब्ध
Online Complaint Portal
डॉ. सुहास कांबळे | नगरसेवक | प्रभाग ८ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका